


# भाषांतर प्रक्रिया

संपादक
प्राचार्य डॉ. शोभा इंगवले
प्रा. नयनिका नलावडे
प्रा. डॉ. दीपक गायकवाड

## राज्यस्तरीय चर्चासत्र



उद्घाटक मा. डॉ. शोभा नाईक दीपप्रज्वलन करताना
सोबत मा. प्रमिलाताई गायकवाड (सरचिटणीस अ. भा. म. शि. परिषद)
मा. प्राचार्य डॉ. शोभा इंगवले




प्रमुख पाहुणे मा. डॉ. चंद्रकांत पाटील यांचे स्वागत करताना
संस्थेच्या सरचिटणीस मा. प्रमिलाताई गायकवाड

# भाषांतर प्रक्रिया

संपादक

प्राचार्य डॉ. शोभा इंगवले
प्रा. नयनिका नलावडे
प्रा. डॉ. दीपक गायकवाड

ज्ञानसूर्य प्रकाशन, पुणे

**भाषांतर प्रक्रिया**

**संपादक**

**प्राचार्य डॉ. शोभा इंगवले, प्रा. नयनिका नलावडे, प्रा. डॉ. दीपक गायकवाड**

**आवृत्ती पहिली :**
**१० जून २०१७**

ISBN-978-81-926144-9-6

© ज्ञानसूर्य प्रकाशन

**प्रकाशन क्रमांक : १९**

**मुखपृष्ठ :**
राजश्री जाधव, पुणे

**अक्षरजुळणी :**
**सिद्धी ग्राफिक्स, पुणे**

**मुद्रण :**
श्री गणेश मुद्रणालय, पुणे

**किंमत : २२०**

**प्रकाशक व मुद्रक**
**डॉ. उमा काळे-माळी**
**मारुती माळी**
**ज्ञानसूर्य प्रकाशन**
सर्व्हे नं. २१५, गंगानगर, पोस्ट फुरसुंगी,
ता. हवेली, जि. पुणे - ४१२ ३०८
भ्रमणध्वनी : ९७६५९०४१०३ /
९८८१२१५३६५
Email : umakaleswati@gmail.com
dnyansuryapublication@gmail.com

ज्यांच्या तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध, समर्पित व्यक्तिमत्त्वाच्या कार्यातून
आम्हाला सदैव प्रेरणा मिळाली त्या कै. समाजभूषण उत्तमराव पाटील
ऊर्फ अण्णासाहेब पाटील यांना सादर अर्पण

## ऋणनिर्देश

'भाषांतर प्रक्रियेत भाषांचे स्थान' या विषयावर मराठी व इंग्रजी विभागाने चर्चासत्र आयोजित केले. या चर्चासत्रात सादर केलेल्या शोधनिबंधाचे ग्रंथरूपातील दर्शन सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस मा. प्रमिलाताई गायकवाड यांच्या प्रेरणेतून व सहकार्यातून सदर ग्रंथ सिद्ध होऊ शकला त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

ज्यांच्या लेखांमुळे ग्रंथनिर्मिती झाली त्या सर्व अभ्यासू प्राध्यापकांचे आभार.

हा ग्रंथ प्रकाशित होताना इंग्रजी विभागातील प्रा. जयसिंग बाबर, डॉ. अनघा बलदोटा, मराठी विभागातील प्रा. सारिका थोरात व महाविद्यालयातील सर्व सहकारी यांचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. सुदाम कांबळे यांचे योगदानही महत्त्वाचे आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार! तसेच ज्ञानसूर्य प्रकाशक डॉ. उमा काळे यांनी कमी कालावधीत परिश्रमपूर्वक ग्रंथ प्रकाशित केल्याबद्दल त्यांचेही आभार!



## अनुक्रमणिका

प्रस्तावना । दीपक बोरगावे । ११

इंग्रजी-मराठी अनुवाद : भाषेची भूमिका । डॉ. शोभा नाईक । ३७

अनुवादप्रक्रिया । चंद्रकांत भोंजाळ । ४९

ललित साहित्याचे भाषांतरः स्वरूप आणि आवश्यकता ।
प्राचार्य डॉ. शोभा इंगवले ।५४

भाषांतर : स्वरूप, व्याप्ती आणि आवश्यकता । डॉ. वेदश्री थिगळे । ५९

अनुवादक सेनापती बापटांचे मराठी सारस्वताला योगदान । डॉ. केतकी मोडक । ६६

इंग्रजी भाषेतून मराठीत अनुवादित कादंबरी । प्रा. दीपक गायकवाड । ७५

भाषांतरकार आवश्यक गुण व महत्त्व । प्रा.डॉ. सुभाष आहेर । ८२

भाषांतरकार मंगेश पाडगावकर । डॉ. महालक्ष्मी मोराळे । ८६

अनुवादित मराठी आत्मचरित्रांचे अनुवाद कौशल्य । प्रा. डॉ. बाबासाहेब रोडे । ९१

अनुवादाचे सांस्कृतिक महत्त्व । प्रा. नाना झगडे । १०१

भाषांतरकाराची भूमिका । प्रा. वैशाली देठे । १०६

मराठीतील अनुवादित कादंबरी लेखन । वंदना सोनवले । ११७

भाषांतर विद्येची व्याख्या, स्वरूप व ललित साहित्यकृतीचे भाषांतर।

2017

प्रा. सारिका थोरात । १२४

भाषांतरप्रक्रियेचे महत्त्व आणि त्यातील अडचणी । डॉ. वैजयंतीमाला जाधव । १३१

अनुवादित साहित्य : व्याख्या, स्वरूप व व्याप्ती । सरिता सोमाणी । १३५

भाषांतराचे महत्त्व आणि प्रकार । प्रा. महेश रणदिवे । १४३

भाषांतर : शास्त्र की कला? । सुनिता देशमुख । १४७

भाषांतरः एक प्रगत कौशल्य । डॉ. प्रभाकर घोडके । १५२

अनुवाद स्वरूप ओर प्रक्रिया । प्रा. दशरथ वाघ । १५६

**Translation Studies : Principles and Reader's Perspective** | Prof. Dhimate Sangita | 161

**Problems In Translation of Vijay Tendulkar's Marathi Plays Into English** | Dr. Rajendraprasad Shinde | 169

**Challenges face by the library to provide Translation Service for its users**
Mr. Prakash Jadhav, Mr. Santosh Khajindar | 179

**Translation and its Use in Indian Courts** | Ravindra Patil | 186

**Marathi Autobiography in Translation** | Vivek Khabde | 197

**Intricate Pathways: Observations on Translation of Mahesh Elkunchwar's 'Wada Chirebandi'** | Dr Deepali Patil | 204



## प्रस्तावना

**दीपक बोरगावे**

भाषांतर प्रक्रियेत भाषांचे स्थान या राज्यस्तरीय चर्चासत्रात श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे येथे दि. ८ व ९ जानेवारी २०१६ रोजी सादर झालेल्या निवडक शोधनिबंधावर आधारित एक पुस्तक प्रकाशित करायचे आहे व तुम्ही या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहाल का? असा प्रश्न घेऊन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शोभा इंगवले मॅडम मला भेटायला आल्या; भाषांतराभ्यास हा तुमचा अभ्यासाचा विषय असल्याने या पुस्तकाला प्रस्तावना लिहावी अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. डॉ. इंगवले मॅडम या पूर्वाश्रमीच्या रयत सेवक असल्याने व काही वर्षे प्राध्यापक सहकारी म्हणून काम केले असल्याने त्यांच्या प्रश्नाला नाही म्हणणे जमले नाही. एकूण पंचवीस शोधनिबंधांचे बाड (१९ मराठी आणि ६ इंग्रजी) माझ्या हाती सोपवून त्या निघून गेल्यानंतर हे सर्व निबंध व्यवस्थित वाचून काढले. हे करत असताना प्रकर्षाने एक गोष्ट माझ्या लक्षात आली की यातील बरेच निबंध हे निश्चितच चांगल्या दर्जाचे आहेत. शिवाय भाषांतराभ्यासावर मराठीतून चर्चासत्र आणि या विषयावर काही विचारमंथन ही बाब भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाची व आशादायी आहे या भावनेपोटी ही प्रस्तावना लिहणे मला आवश्यक वाटले.

सादर झालेल्या अनेक शोधनिबंधातून भाषांतराभ्यासाच्या संदर्भात बरेच महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. हीच अपेक्षा अशा चर्चासत्रातून असते. या निबंधवाचनातून पुरेशी साधकबाधक चर्चाही या चर्चासत्रात झाली असावी असे म्हणायला हरकत नाही. या प्रस्तावनेच्या निमित्ताने प्रामुख्याने काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रसंगचित्रण उत्कट परंतु, संयमित रीतीने रेखाटले आहे. सामथर्यवान अभिव्यक्तीने नटलेली ही कादंबरी आहे. कथानक अगदी रोचक, वळणावळणाचे आहे. व्यक्तिरेखा अतिशय जिवंत व ठसठशीतपणे उभ्या केलेल्या आहेत. त्यांच्या बारकाव्यांसह अधोरेखित केलेल्या आहे. माणुसकीचे दर्शन घडवणारी ही कादंबरी जीवनाचे वेडेविद्रे दर्शनही घडवते. अपर्णाच्या तोंडी असलेली वाक्ये अभ्यासपूर्ण आहेत. विलक्षण तज्ज्ञ, अभ्यासक, अनुभवी संयमी अशी व्यक्तिरेखा आहे. तशीच श्रद्धावान सिस्टर मागरिट एक वेगळी चुणूक दाखवून जाते. चांदणी, काजोल, व्हीकी, बबलु, दिनेश, शंकर आदी पात्रांना साजेशी नावे देण्यात आली आहेत. निवेदन पद्धती ओघवती आहे. प्रसंग रेखाटन प्रभावीपणे झाले आहे.

डॉ. अश्विनी धोंगडे यांच्या 'जस्मिन' व 'सडकछाप' या अनुवादित कादंबऱ्याची शीर्षकही अतिशय समर्पक आहेत. भाषांतरे ही स्वाभाविक व अकृत्रिम झाली आहेत. हे भाषांतर आहे असे न वाटता लक्ष्य भाषेतील मूळ लेखनच आहे असे वाटते. या दोन्ही गोष्टी एकदम साधणे हीच भाषांतरातील तारेवरची कसरत होय. कधी-कधी असे होते की, आशय सांभाळायला जावे तर सहजता बिघडते, सहजता साधायचा प्रयत्न करावा तर आशयाला धग पोहचते. परंतु डॉ. अश्विनी धोंगडे यांनी दोन्ही गोष्टी अतिशय कौशल्याने हाताळलेल्या आहेत. आणि ही भाषांतरे यशस्वी झालेली आहेत हे आपणाला दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१) धोंगडे अश्विनी : 'जस्मिन', दिलीपराज प्रकाशन, पुणे
२) धोंगडे अश्विनी : 'सडकछाप' पेंग्विन प्रकाशन, २००८, पुणे
३) मोकाशी मधुकर : 'भाषांतर चिकित्सा', स्नेहवर्धन प्रकाशन, २००४, पुणे



# भाषांतरप्रक्रियेचे महत्त्व आणि त्यातील अडचणी

**डॉ. वैजयंतीमाला जाधव**

सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषांतर अभ्यास हा केंद्रवर्ती गणला जातो. विविध आंतरविद्याशाखांमध्ये सध्या ज्ञानाचे आदान-प्रदान मोठ्या प्रमाणावर होत आहे. भाषांतर ही संज्ञा फक्त संहिता या घटकाशी संबंधित नसून ती संस्कृतीशी निगडीत आहे. संहिता एका भाषेतून दुसऱ्या भाषेत आपण अनुवादित करत असताना त्या संहितेशी निगडीत संस्कृतीही आपण दुसऱ्या भाषेत नेत असतो. भाषांतर ही संज्ञा सांस्कृतिक क्षेत्राच्या संदर्भात व्यापक अर्थाने वापरली जाते. भाषांतर करत असताना केवळ भाषेचा विचार अपेक्षित नसून भाषेचा परिप्रेक्ष्यात येणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार करणे अपेक्षित असते.

साहित्यकृतीचे भाषांतर ही गुंतागुंतीची प्रक्रिया असते. दोन भाषांशी, दोन संस्कृतींशी निगडीत अशी ही वाङ्मयाची निर्मिती, भाषांतराच्या प्रक्रियेचा अभ्यास हा केवळ एकाच भाषासाहित्य परंपरेत राहून करता येत नाही त्यासाठी काळ, देश, भाषा, साहित्य, संस्कृती यांच्या सीमारेषा ओलांडून जाणे महत्त्वाचे असते. भाषांतराच्या मागील उद्देशावरून भाषांतराचे प्रकार ठरतात. मूळ भाषेतील संहिता शब्दशः समजावून सांगायची असेल तर त्या संहितेचे शब्दशः भाषांतर केले जाते. यामध्ये संहितेला अधिक प्राधान्य असते. याला मूलनिष्ठ भाषांतर असे म्हणतात. तर ज्या भाषांतरामध्ये मूळ संहितेची भाषा समजावून सांगण्याचा उद्देश नसेल तर मूळ संहितेच्या आशयाचे लक्ष्य भाषेच्या अंगाने भाषांतर केले जाते. त्याला 'लक्ष्यनिष्ठ भाषांतर' असे म्हणतात. भाषांतराचे महत्त्व हे आज वाढतच चाललेले दिसते. शास्त्रीय भाषा व्यवहारात, दैनंदिन भाषाव्यवहारात, साहित्य क्षेत्रात तसेच धार्मिक क्षेत्रात भाषांतर विद्या वापरली जाते. दोन भाषिक व्यवस्थांमधील भिन्नता, दोन ऐतिहासिक परंपरा यातील वेगळेपण भाषांतर प्रक्रियेमध्ये ध्यानात येते. आज विविध संस्कृती आणि त्यांचे आदानप्रदान वेगाने होत आहे. अशावेळी विभिन्न संस्कृती आणि

त्यातील साहित्य यांच्या भाषांतराच्या प्रक्रियेने त्या त्या भाषेतील साहित्य आणि संस्कृती यांचे आकलन सहजगत्या होणे शक्य असते. दोन भिन्न काळ, दोन भिन्न कालखंड, एकाच लेखकाच्या भिन्न काळातील दोन कलाकृती यांचा अभ्यास केला असतो, साहित्य, संस्कृती स्तरावर घडणाऱ्या अनेक घटनांची संगती लावता येते. भाषिक समृद्धीच्या दृष्टिकोनातून अशा प्रक्रिया अतिशय महत्त्वाच्या असतात. वेगवेगळ्या भाषांमध्ये आज वेगाने ज्ञान माहितीचा स्त्रोत उपलब्ध होत असलेला दिसतो. एका भाषेतील हे ज्ञान भाषांतर प्रक्रियेमुळे जेव्हा दुसऱ्या भाषेत येते तेव्हा तिच्या संस्कृतीसह येते अविकसित, विकसनशील देशांमध्ये ज्ञानप्रसार व शिक्षणासाठी भाषांतर प्रक्रियेचे महत्त्व वाढत आहे. भाषांतरप्रक्रियेमुळे विविध भाषेतील आचारविचार देवाण-घेवाण, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक ज्ञानाचा प्रसार वेगाने होतो.

जागतिकीकरणाच्या सध्याच्या युगात इंग्लिशसारखी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून ओळखली जाते. मनोरंजनाच्या क्षेत्रात भाषांतरप्रक्रियेला महत्त्वाचे स्थान आहे. प्रादेशिक भाषांतील सिनेमांना परदेशात मागणी आहे. त्यासाठी इंग्रजीत भाषांतरित केलेला मजकूर पुरवठ्याचा उपयोग वाढीस लागला आहे. जागतिक वैश्विक आणि सांस्कृतिकतेच्या पातळीवर विविध भाषांतील साहित्य इंग्रजीत भाषांतरित होत आहे. यामुळे दोन राष्ट्रांमध्ये वाङ्मयीन आदान-प्रदान होण्यास मदत होते. भारतासारख्या देशामध्ये संस्कृतीची विविधता लक्षात घेतली तर विविध साहित्यसंस्कृतीचे भाषांतर होणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक साहित्यकृतीत असलेली विविधता, त्यामधील कविता, कथा, कादंबरी यांच्या विविध परंपरा यांचे ज्ञानही वाचकाला होते. भाषांभाषांतील सांस्कृतिक आदान प्रदान, वैचारिक देवाण-घेवाण सक्षम रीतीने होण्यासाठी विविध भाषांतील साहित्यकृती उपयुक्त ठरतात. भारतासारख्या बहुभाषिक देशात भाषांतर प्रक्रियेला अधिक महत्त्व आहे. व्यापक जीवनानुभवाचे माध्यम म्हणून भाषांतर प्रक्रियेकडे पाहता येते. भाषांतर प्रक्रियेमुळे आपल्याला विविध भाषांतील सांस्कृतिक आणि भाषिक दुरावा कमी होण्यास मदत होते. तौलनिक साहित्याभाषांमध्येच भाषांतर प्रक्रिया महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते. दोन वेगवेगळ्या भाषातील साहित्यकृतींचा तौलनिक अभ्यास करताना एकच शब्द दोन वेगळ्या भाषांमध्ये कशा प्रकारे अभिव्यक्त होतो. त्याचे अर्थनिर्णय कसे केले जाते. हे भाषांतराच्या माध्यमातून अभ्यासणे सोपे जाते. आज भाषांतर प्रक्रिया ही स्वतंत्र विद्याशाखाच मानली जाते. नोकरी व्यवसायाच्या संधीचा विचार करत असताना,



भाषांतराच्या प्रक्रियेमुळे अधिकाधिक अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध होत आहेत असे ।वि विविध अभ्यासक्रमांचे त्यातील अभ्यास घटकांचे वेगवेगळ्या भाषेमध्ये भाषांतर करण्याची प्रक्रिया वाढीस लागली आहे. परप्रांतीय संस्कृतीचा परिचय, तेथील संस्कृती यांना एकत्र करण्याचे काम केवळ भाषांतर प्रक्रियेच्या माध्यमातून होते. जागतिक दर्जाच्या भाषांचा विचार करताना तेथील व्यापार उद्योग व्यवसायामध्ये संधी मिळवताना या भाषा आत्मसात करणे फायद्याचे ठरते.

दिवसेंदिवस भाषांतराचे सांस्कृतिक आणि जागतिक महत्त्व वाढत आहे. भाषांतर प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष भाषांतर करत असताना काही समस्या येतात. त्यामध्ये सर्वात मोठी समस्या म्हणजे दोन भाषा बोलणाऱ्या समान आणि संस्कृतीचे सहजपणे आकलन भाषांतरकर्त्याला होत नाही. भाषांतर करताना भाषेच्या, संकल्पनेच्या व अर्थाच्या पातळीवर ही समस्या सतत जाणवत राहते. मूळ भाषा आणि लक्ष्य भाषेतील सांस्कृतिक फरक, नीतिमत्ता, सामाजिक रूढी परंपरा यांच्याविषयी सखोल माहिती नसल्यास भाषांतरकर्त्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. एखाद्या साहित्यकृतीचे भाषांतर करत असताना मूळ साहित्यकृतीमागे दडलेली संहिता उलगडण्याचे काम भाषांतरकर्त्याला करावे लागते. ही संहिता जर ललित साहित्य असेल तर त्यातील शब्दांचा जसाच्या तसा अनुवाद न करता, भाषांतरकर्त्याला तेथे स्वातंत्र्य द्यावे लागते. शब्दांचे, वाक्याचे जसेच्या तसे भाषांतर केल्यास ते रसहीन ठरण्याची शक्यता असते. बोलीमध्ये ज्या साहित्यकृतीचे लेखन केलेले आहेत, त्याचे भाषांतर करताना अनुकूल स्वरूपाची अशी बोली लक्ष्यभाषेची नसते. मग त्याचे भाषांतर नेमक्या कशा प्रकारे करायचे ही एक महत्त्वाची समस्या असते. त्यावर उपाय म्हणून मग बोलीतील त्या साहित्यकृतीचे भाषांतर प्रमाणभाषेमध्ये केले जाते. यावेळी त्या साहित्यकृतीमध्ये चित्रित झालेली संस्कृती, तेथील रीतिरिवाज, परंपरा, निसर्ग यांचे भाषांतर करणे अडचणीचे ठरते. मग विविध पदटिपांच्या साहाय्याने किंवा तेथील संस्कृतीचा अभ्यास करून थोडेसे स्वातंत्र्य घेऊन भाषांतरकर्त्याला भाषांतर करावे लागते. सांस्कृतिक भिन्नतेमुळे मूळ संहितेतील भाषेच्या इतरही अनेक सांस्कृतिक अर्थाचे पदर भाषांतरामध्ये कसे निर्माण करावेत, की ते भाषांतर अगदी नैसर्गिक होईल. हा भाषांतरकर्त्यासमोर मोठा प्रश्नच निर्माण होतो. सांस्कृतिक फरकामुळे भाषांतरामध्ये विविध तडजोडी कराव्या लागतात. दोन भिन्न भाषेमधून येणारी संस्कृती व त्यामधील फरक ही भाषांतर प्रक्रियेमधील महत्त्वाची समस्या आहे. या दोन भिन्न संस्कृतीचे भाषांतर करणे ही एक अडचण

भाषांतरकर्त्यासमोर असते. उदा. विजय तेंडूलकरांचे 'धाशीराम कोतवाल' हे नाटक भाषांतरित करीत असताना दोन भाषांमधील सांस्कृतिक अंतर ही समस्या महत्त्वाची आहे. भाषांतर करत असताना मूळ मजकुराशी प्रामाणिक राहिले पाहिजे. पण तसे करताना भाषांतरात बोजडपणा येणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक कलाकृतीचा अनुवाद हे अनुवादकर्त्यापुढे आव्हान असते. न्यायालयीन परिभाषा, कायद्याशी संबंधित परिभाषा, नियम यांचे भाषांतर करताना भाषांतरकर्त्याने जसेच्या जसे करणे गरजेचे असते. मूळ मसुदाकाराने बनवलेल्या मसुद्याचे आकलन योग्य पद्धतीने करून घेणे आणि भाषांतर करताना ते काटेकोरपणे मांडणे हे अतिशय महत्त्वाचे असते. या भाषांतरामध्ये प्रथम अर्थनिष्ठता नंतर शब्दनिष्ठता व मागाहून भाषेचे शब्दांचे सौंदर्य तत्त्वक्रम पाळणे गरजेचे असते. प्रस्तुत लेखात आपण भाषांतराचे महत्त्व आणि त्यामधील अडचणींचा थोडक्यात ऊहापोह केला. जगभरात अनेक भाषातून उत्तमोत्तम साहित्यनिर्मिती होत असते. ह्या साहित्याचा आस्वाद भाषांतर प्रक्रियेद्वारे घेता येतो. विविध साहित्य आणि संस्कृतीच्या अभ्यासातून भिन्न भाषिक संस्कृतीच्या जगण्याचे आयाम लक्षात घेता राष्ट्र आणि भाषांच्या भेदांपलीकडे जाऊन वाङ्मयीन परिप्रेक्ष्यांचा विचार केला जातो. दोन संस्कृतीच्या परस्परसंवादामुळे नवसाहित्यनिर्मितीला चालना मिळते. जागतिकीकरणाच्या या युगात अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या भारतात येऊन स्थिरावल्या आहेत. त्यामुळे या सर्व प्रक्रियेत भाषांतरप्रक्रियेला दिवसेंदिवस अधिक महत्त्व प्राप्त होत आहे.



# अनुवादित साहित्य : व्याख्या, स्वरूप व व्याप्ती

**प्रा. सरिता सोमाणी**

भाषांतर ही केवळ भाषाविषयक आदानप्रदानाची प्रक्रिया नसून विविध देशीय आणि विविध भाषक मानवी समूहांना जोडणारा तो एक सांस्कृतिक अनुबंध आहे. एका मनातील विचार व भावना अखिल मानवजातीपर्यंत पोहोचून सर्वांच्या अंत:करणात एक संवेदना निर्माण करू शकणारी ती एक प्रगल्भ व व्यापक अशी जीवनविषयक जाणीव आहे. धर्म, साहित्य, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान अशा विविध क्षेत्रांचा व ज्ञानशाखांचा केंद्रबिंदू माणूस हा आहे. देश, काल व भाषा यांच्या सीमा ओलांडून या सर्व क्षेत्रातील विचार त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे काम भाषांतराद्वारे घडत आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या माहिती तंत्रज्ञानाच्या, गतिमान स्पर्धेच्या युगात सर्वच क्षेत्रांच्या विकासासाठी भाषांतराची गरज आहे. वाणी-लेखणीपासून यंत्रापर्यंत अनेकविध माध्यमांतून हे भाषिक कौशल्य आकार घेत आहे. आणि या क्षेत्राच्या अभ्यासाची गरज वाढते आहे.

आज मराठीत विविध भाषांमधून भाषांतराच्या मार्गाने आलेले वाङ्मय विपुल प्रमाणात आहे. कानडी, बंगाली, हिंदी यांसारख्या भारतीय भाषांमधून आलेल्या कथा, कादंबऱ्या, कविता इ. ललित साहित्य मराठी साहित्याच्या कक्षा वाढविण्याच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. आंतरभारतीच्या संदर्भात ही विविध भाषांतील देवाणघेवाण महत्त्वपूर्ण कार्य करणारी आहे.

१) अस्तित्व - मूळ लेखिका - सुधा मूर्ती, अनु. प्रा. ए. आर. यार्दी.

२) पुण्यभूमी भारत - मूळ लेखिका - सुधा मूर्ती, अनु. लीना सोहोनी

३) जेहाद - मूळ लेखक - बोळवारू महंमद कुत्रि, अनु. डॉ. अ. रा. यार्दी